भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.६९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०१/२०१७

**१ लोखंडी फायटर ने डोक्यावर,छातीवर मारून जखमी करून नगदी ३,६००/—रू. हिसकावुन नेल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २६/०१/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी जितेंद्र वसंता ढबाले वय २९ वर्ष, रा. माडगी हा त्याचे हात ठेल्यावर गुपचुप विकत असतांना यातील आरोपी हा त्याचे मोटार सायकल वरून उतरून फिर्यादी जवळ जावुन फिर्यादीचे हातात असलेले नगदी ३,६००/—रू हिसकावुन घेवुन त्याचे बोटात असलेले लोखंडी फायटर ने फिर्यादीचे डावे कानाच्या मागे डोक्यावर, छातीवर मारून पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३९४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुडले पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) तीन्ही आरोपीने संगनमत करून गुंगीकारक औषध पाजुन अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/०१/२०१७ चे १०.० वा. ते दि. २५/०१/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी ही दिघोरी नानोरी येथे दि. २३/०१/२०१७ रोजी मामाचे घरी असतांना व अल्पवयीन असल्याचे आरोपी क्र. १ ला माहीत असुन सुध्दा तिला लग्नाचे आमीष दाखवुन आटोने लाखनी पर्यंत आनले व नंतर एसटी बसने भंडारा येथे नेले व भंडारा येथुन आरोपी क्र.२ सोबत मिळुन फिर्यादीस मोटार सायकलने नागपुर येथे नेले आणि दि. २३/०१/२०१७ रोजी तिन्ही आरोपीने संगनमत करून फिर्यादीचे आरोपी क्र. १ तसेच घटने तारखेच्या रात्रीला तिन्ही आरोपीने संगनमत करून ज्युस मध्ये कोणीतरी गुंगीकारक औषध पाजुन आरोपी क्र. १ याने फिर्यादी सोबत जबरी संभोग केला अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३६३ (ब),३६६(अ) ३७६(२) (आय),३२८,१०९ भादवी. सहकलम ६ बा.लै.अ.सं.अधी.२०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कुरील पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) राष्ट्रध्वज जमिनीवर पडुन अप्रतिष्ठा झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २६/०१/२०१७ चे ०८.४५ वा. दरम्यान. यातील आरोपी ही प्रजासत्ताक दिन कार्यक्रमाचे ध्वजारोहन करीत असतांना राष्ट्रध्वज फडकवीण्या करीता वापरलेली दोरी आरोपीचे हातुन सुटुन राष्ट्रध्वज जमीनीवर पडुन अप्रतिष्ठा झाल्याने फिर्यादी राजेश राधेशाम गोयंका वय ४७ वर्ष रा.पवनार खारी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २ राष्ट्रसन्माच्या अप्रतीष्ठीत प्रतीबंधक अधीनीयम १९७१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावने पोलीस स्टेशन गोबरवाही हे करींत आहेत.

**४) अवैध दारू अडयांवर धाडी . :—**

दिनांक २६/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. तुमसर, लाखनी , पवनी, येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५०० लिटर हातभट्टी दारु किमती ५००/—रु. व ३ लिटर ६०० मिली लिटर देशी दारू कि. १०० /—रू. असा एकुण १,५००/—रू चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.